


Walwa Taluka Education Society's



# Malati Vasantdada Patil Kanya Mahavidyalaya, Islampur.

## PROCEEDING



U.G.C. Sponsored

Two Day National Conference on

# Progressive Movement in India : Past and Present (Interdisciplinary)

Organised by

Department of History

Scanned by CamScanner

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

# Progressive Movement in India: Past & Present

# PROCEEDING

## UGC Sponsored Two Day National Conference

## Organized by

*"Bahujan Hitaya, Bahujan Sukhaya"*


Walwa Taluka Education Society's

**MALATI VASANTADADA PATIL KANYA MAHAVIDYALAYA**

**Islampur, Tal.Walwa, Dist. Sangli (Maharashtra)**

NAAC ACCRIDITED 'B' Affilliated to Shivaji University, Kolhapur.

■ Ph. No.: 02342-223062 (O) ■ E-mail : malatinc2015@gmail.com

■ Website : www.malaticollege.com


## Department of History

## With Intellectual Partner Shivaji Vidyapeeth Itihas Parishad


**Editor**

**Mr.R.G.Ghule**



**October 2015**



Scanned by CamScanner

# Progressive Movement in India: Past & Present (Interdisciplinary)

---

**Editor**
**Mr.R.G.Ghule**

---

**Co-Editor**
**Mrs.V.R.Londhe**

---

**© All rights reserved Principal, M.V.P.K.Mah. Islampur**

---

**ISBN: 978-93-81549-95-7**

---

**© Published by**
**Principal**
**Dr.Ankush Belvatkar**
Malati Vasantadada Patil Kanya Mahavidyalaya,Islampur

---

**Prienter**
Smita press, Islampur

---

**Cover and Layout Design**
Mr. Eliyas Jamadar

---

**October 2015**
**This is published with the financial assistance from University Grant Commission (UGC)**
For Private Circulation Only

---

**Publisher**
**ABS Publishers, Varanasi - 221 007**
**Ph. 09450540654**
**Email : abspublication@gamil.com**

---

*The college and Shivaji Vidyapeeth Itihas Parishad do not necessarily share the views expressed the content of the proceeding*

---

Scanned by CamScanner

59 स्त्रीमुक्ती चळवळीचे बदलते स्वरूप 252

प्रा. सांगळे बी. के.

60 सत्यशोधक जलसाकार : तातोबा यादव (कासेगावकर) 256

भिंगारदिवे गजानन बाबासाहेब

61 सामाजिक व आर्थिक क्रांतीचे आद्य प्रणेते–राजर्षी छत्रपती शाहू महाराज 261

प्रा.तटाळे पद्माकर बळीराम

62 बहिष्कृत हितकारिणी सभेचे समाजसुधारणा चळवळीतील कार्य 264

डॉ. माधुरी राजाराम खोत.

63 ''संत नामदेवांची महाराष्ट्राबाहेरील भक्ती चळवळ'' 267

दिपक बाबुलाल धोबी

64 Status Of Gram Panchayat Finance Past And Present 272

Mrs. Megha Vijay. Patil

65 ब्राम्हो समाज–आधुनिक भारताच्या सामाजिक–धार्मिक सुधारणा चळवळीचा प्रेरक 277

प्रा.डॉ. सौ. कल्पना राजीव मोहिते

66 फुले दांम्पत्य : स्त्री मुक्ती चळवळीचे जनक 282

श्रीमती एच.एम बारसकर

67 Progressive Thoughts of Basaveshwara on Social Justice 286

Dr. Nalini Avinash Waghmare

68 ''स्त्री आंदोलनाचे पूर्वरंग आणि सद्यस्थिती'' 289

प्रा.कु.नीता निवास कदम.

69 अकबर बादशाह : एक सुधारक नेता 291

प्रा. गित्ते सुनिता हनुमंतराव

70 Sport Activities versus Academic Achievements For Rural Senior College Students from Walwa Taluka. 293

Dr. Jaysing Shankrrao Patil

71 Physical Activities versus Academic Achievement For Rural High School Students from Walwa Taluka. 299

Dr. Narayankar Hemantkumar A.


Scanned by CamScanner

ISBN 978-93-81549-95-7

# ''संत नामदेवांची महाराष्ट्राबाहेरील भक्ती चळवळ''

संशोधक विद्यार्थी :
दिपक बाबुलाल धोबी
मु. पो. गोंदेगाव ता. जामनेर जि. जळगाव – 424204

**प्रस्तावना :**

संत हे जगाच्या कल्याणासाठी असतात. समाजाच्या उध्दारासाठीच त्यांचा जन्म होत असतो. महान संतांमध्ये ''नामदेव'' हे एक महत्वाचे संत होत. संतांचे महात्म्य वर्णन जगात कोणीही करू शकत नाही. संतांचे वर्णन करतांना श्री समर्थ रामदास म्हणतात.

संत आनंदाचे स्थळ । संत सुखाची केवळ ।
नाना संतोषाचे मुळ । ते हे संत ।। 16।।
जे त्रैलोकी नाही दान । तें करीता संत सज्जन ।
तया संतांचे महिमान काय म्हणौनि वर्णावे ।। 24 ।।

यातुन संत हे जगाच्या कल्याणासाठी असतात. व देह कष्ठ वितातो ते परोकारे या उक्तीला न्याय मिळेल असेच एक संत नामदेव होत.

**जन्म व बालपण :**

नामदेवांचा जन्म 26 ऑक्टोंबर 1270 मध्ये पंढरपूर येथे झाला.[1] वडील दामोशेठ शींपी आणि आई गोणाई हे मुळचे परभणी जिल्ह्यातील नरसीवामणी या गावाचे होते. आई गोणाईने पुत्रप्राप्तीसाठी पंढरपुर येथील विठ्ठलाला नवस केला. व असा नवसाने तो मुलगा झाला, तोच नामदेव होय. कुटूंबात त्यांना बालपणापासुनच भक्तीचा मेळा होता. [illegible]व्या वर्षीच त्यांचा विवाह गोविंदशेही सदावर्ते यांच्या मुलीशी झाला. पत्नीचे नाव राजाई. विवाहापासुनच त्यांचे मन आपल्या संसारात व वाड वडीलांपासुन चालत आलेल्या शिवण कामाच्या धंदयात रमले नाही. विठ्ठलभक्तीमध्ये त्यांचे मन एकाग्र झाले.

**गुरुपदेश :**

नामदेव यांची गोरावा कुंभार (काका) यांनी घेतलेली परीक्षा यातुन त्यांचे मन उद्वीग्न झाले. भक्ती ही निष्काम व गुणविरहीत असावी. तामोगुनांचा, राजोगुनांचा त्यात लेश नसावा. असा उपदेश गोरोबा काका यांनी नामदेवांना केला सत्वपरीक्षेत उतरले नाही. ते पंढरपुरला जाऊन ते अंतर्मुख ष्टीने विचार करू लागले. हळूहळू त्यांना अपनामधील उणिवांची जाणीव होऊ लागली. म्हणून त्यांना एक गोष्ट उमजून आली सद्गुरुवाचून ईश्वरप्राप्ती होउ शकत नाही. म्हणून ईश्वरी प्रेरनानुसार औंढा नागनाथ येथील संत विसोबा खेचर त्यांच्याकडे गुरुपदेश घेण्यास गेले.नागनाथ म्हणजे प्राचीन व्दारका वनातील नागेश हे बारा ज्योतिर्लिंगापैकी एक तेथे नामदेवांना विसोबा खेचरांचे दर्शन झाले.[2] देवावर पाय ठेऊॅन निजलेल्या खेचाराला नामदेव म्हणाले,

''उठी उठी प्राण्या आंधळा तू काय । देवावरी पाय ठेवियले ।।''



Scanned by CamScanner

ISBN 978-93-81549-95-7

नामदेवाला विसोबा खेचाराने पदपिंडवीवर्जित केले म्हणजे ब्रम्हभाव आणि जीवभाव हे दोन्ही नाहीसे करून त्याला केवळ ब्रम्हरूप केले विसोबा खेचरेचा उपदेश आणि त्यामुळे नामदेवांना मिळालेली ज्ञानदृष्टी हे एक उत्तम संवाद गुरुशिष्यांचा झाला.मलेही नामदेवांची भक्ती आंधळी होती. ती गुरुपदेश झाल्यावर डोळसझाली. ईश्वराचे अस्तित्व त्यांना जळी, स्थळी, काष्टी, पाषाणी स्थळांवर दिसू लागले, म्हणून ते म्हणत कि,

नाचू कीर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लाऊ जागी ।
परहुनी परते घर। तेथे राहू निरंतर ।
सर्वांचे जे अधिष्ठाण । तेची माझे रुपपुर्ण ।
सर्व सत्ता आली घमा । नामयाचा खेचर दाता ।।

यातूनच नामदेवांनी भक्ती पंचज्ञानेंद्रीये व पंचकर्मन्द्रीये यातून केली पाहिजे तर परमेश्वर प्राप्ती होऊ शकते. याचा शोधबोध घेतला.

**देशाटनः**

ज्ञानदेव इतर संतमंडळी याच्या सहवास नामदेवांना सुमारे सहा सात वर्षे मिळाला. याच काळात पंधरपूर ते आळंदी हा महाराष्ट्रातील परिसर नामदेवांच्या कीर्तनाने ज्ञान–देवांच्या प्रवचनाने अक्षरशरू दुमदुमून गेला. याच काळात ज्ञानदेव नामदेवांना भेटण्यासाठी पंढरपूरला आले. त्यावेळी ज्ञानदेवांनी आपल्या तीर्थयात्रेचा मनोदय व्यक्त केले. नामदेव प्रथम तीर्थयात्रे विषयी उत्सुक नव्हते. कारण सर्व तीर्थ पंढरीच्या विठ्ठलाजवळच आहे. असे ते मानत पण ज्ञानेश्वर नामदेव यांच्या संवादातून त्यांनी तीर्थयात्रेला जाण्यास प्रारंभ केला. यातूनच संतमंडळी व ज्ञानदेवांच्या सहवासात त्यांनी तीर्थयात्रा पूर्ण केली. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास होण्यास मदत झाली असावी त्यामुळे त्यांच्या भक्तीचे केंद्र केवळ पंढर्पुरातच नव्हते तर संपूर्ण महाराष्ट्राबाहेर फुलण्यास मदत झाली. पंढरपूरहून निघून ते उत्तरेकडे द्वारकेपर्यंत गेले. तेथे बिकानेजवळ कोलादजी नामक गावी पाण्याचे अति दुर्भिक्ष होते. पण नामदेवांनी केवळ भक्तीच्या बळावर तेथे जलरुपी भक्तीचा झरा निर्माण केला.[3]

**महाराष्ट्राबाहेरील देशाटन :**

नामदेवांना सुमारे छप्पन–सत्तावन्न वर्षांचे आयुष्य लाभले. या काळातील त्यांचे जीवन चरित्र त्यांच्या वा इतरांच्या मराठी अभंगातून मिळू शकत नाही ज्ञानेश्वरांच्या समाधीमुळे त्यांच्या आयुष्याला वेगळी कलाटणी मिळालेली दिसते.[4] ज्ञानेश्वरांच्या संगतीमुळे नामदेवांनी उत्तरेकडे जे विविध प्रदेश पहिले त्याला आज आपण पंजाब म्हणतो.[5] म्हणून त्यांनी ज्ञानेश्वरांशिवाय एकट्याने उत्तरेकडे यात्रा सुरु केली. संबंध उत्तर आयुष्य नामदेवांनी भक्ती मार्गाच्या प्रचारासाठी घातले. दुसर्या तीर्थयात्रेच्या संबंधात आपल्याबरोबर पंढरी नेईन आणि मी तेथे नांदेन तेथेच पंढरी होईल. असे त्यांची इच्छा प्रत्यक्ष तीत उतरली.[6]

पंजाब प्रांतात गेल्यावर नामदेवांनी एक संतमंडळ स्थापन केले. पंजाबी भाषेतील जनमसाखी ग्रंथात नामदेवांचे चारित्र रेखाटले आहे. जनमसाखी ग्रंथात नामदेवांच्या अनेक घटनांचे वर्णन आहे.ते वर्णन नामदेवांच्या महाराष्ट्रातील वर्णिलेलेचारीत्रासारखे साम्य वाटते.



Scanned by CamScanner

ISBN 978-93-81549-95-7

नामदेव पंजाबात 20 वर्षे होते पंढरपूरहून प्रथम ते द्वारकेला गेले.[7]तेथून मारवाड,मथुरा, हरिद्वार आणि पंजाबकडे वळले. पंजाबमधील अमृतसर जिल्ह्यातील "भूमिपिंड" गावी ते प्रथम गेले. तेथे त्यांना बहोरदास सारखा सतशिष्य लाभला. तेथून ते सध्याच्या गुरुदासपूर जिल्ह्यातील मरड गावी आणि नंतर ते पाहिवाल येथे गेले.तेथे त्यांचे तलावाशेजारी वास्तव्य होते. आजही तो तलाव "नामियाना तलाव" म्हणून ओळखला जातो. त्यांना लढा आणि जल्ला नामक शीख होते. ते शीख अनुक्रमे सुखोवळ व धारिवाल गावी वास्तव्यास होते.

ध्यान धारणेसाठी नामदेवांनी एक निवांत जागी वस्ती केली. त्यांच्या प्रभावामुळे शिष्य तेथे जमा झाले. वस्ती शेजारी "घोमान/घूमान" नावाचे एक नवे गावच वसले. तेथे केशो नावाचा शीष्य लाभला.त्यावेळेच दिल्लीतील बादशहा आलम याने नामदेवांकारिता एक मंदिर बांधण्यास देणगी दिली.[7] याच ठिकाणी 18 व्या शतकात एक सुंदर मंदिर उभारले आहे.

संत नामदेवांच्या उत्तर आयुष्याची माहिती पंजाबी भाषेतील साहित्यात दिसून येते. त्यांनी पंजाबमध्ये विष्णुस्वामी, बहोरदास, लद्ढा, जल्ला, केशोकलाधारी यासारखे सतशिष्य घडविले.[8] त्यांनी देखील आपल्या रचनेत भक्ती मार्गाचा प्रसार–प्रचार केला. शिवाय रामानंद, कबीर, गुरुनानक, रोहिदास आणि पिया या सर्वांनी आपल्या काकरचनेत नामदेवांचा गौरव पूर्ण उल्लेख केला आहे....[9]

**नामदेव व आदिग्रंथ :**

नामदेवांच्या साहित्याचे सर्वात महत्वाचे वैशिष्टे म्हणजे नामदेवांच्या शिकवणुकीचे 69 पदांचा समावेश आदिग्रंठात केलेले आहे. नामदेवानंतर 200 वर्षांनी गुरुनानक यांचा जन्म झाला. त्यांनी स्थापन केलेल्या सिख संप्रदायाची जि मुक्या अध्यात्मिक तत्वे आहेत ते गुरुनंकानी आपल्या "जपजी" मधील आपल्या मुलमंत्रात सांगितली.[10] गुरुनंकांचा मूलमंत्र म्हणजे नामदेवांच्या शिकावानुकिंच्या वागल्या भाषेतील जवळ जवळ अनुवादाच आहे. आदिग्रंथातील नामदेवांच्या पदाबद्दल एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे कि हि सर्व पडे आज तिला आपण पंजाबी म्हणतो त्या भाषेत रचलेली नाहीत. अखिल भारताची अध्यात्मिक आणि सांस्तिक अशी एक शृंखला भाषा आहे. नामदेवांच्या या सामुभाशेतील पडत मराठी आणि आजची पंजाबी यांचा मधुर मेल जमून गेला आहे त्यांच्या मराठी पडत जशी गीतगुण परता आहे.तशी आदिग्रंथातील पदातही आहे. इतकेच काय ती पदे निरनिराळ्या राजदारीत बसवलेली आहेत.[11] नामदेवांना खेचरांचा झालेला उपदेश तो देखील आदि ग्रंथात आहे. तो असा "खेचर भूचर तुलसीमाला । गुरुपरसादी पाउआ ।" म्हणजेच ज्याप्रमाणे नामदेवांनी उपदेश खेचरांनी दिला. तसाच उपदेश गुरुनंकाना मक्केला एका मुलाने दिला. ज्यातून ईश्वराची सर्व व्यापी संकल्पनेचा त्यांना आत्मबोध झाला.

**नामदेव पंजाब :**

नाचू कीर्तनाचे रंगी।
ज्ञानदीप लाऊ जगी ।।

असा पंचवीस वर्षे गजर पंजाबमध्ये संत नामदेवांनी काढला.[12]सोप्या रसाळ लोकभाषेत सांगणारे नामदेव गुरुनानंकाइतके पंजाबमध्ये महत्त्वाचे संत म्हणून ओळखले जातात.[13] शिव–वैष्णव एक्याचा प्रतीक विचार मराठीमधून त्यांनी सर्वत्र पोहचवला.[14]परंतु त्यांनी

ISBN 978-93-81549-95-7

हिंदीतूनही कवणे लिहिली. ती नामदेवजीकी "मुखवणी, म्हणून प्रसिद्ध आहेत.नामदेव शिंपी समाजाचे, पंजाबमध्ये या समाजास "छिवा" म्हणतात.[15]नामदेवानंतर घुमानमध्ये त्यांची गादि त्यांचे शिष्य बाबा बोहरदास यांनी चालविली नामदेवानसोबत बोहरदासचीही गुरुद्वारात समाधी आहे.[16]"सगळेजण बाबा म्हणत. बाबांच्या अपभृंशातून पुढे त्यांचा वंश "बावा" नावाने ओळखला जाऊ लागला.[17] ती पुढे जातच बनली. आजही बावा व छिंबा हे दोन्ही समान एकच मानले जातात.[18] त्यांच्यात रोटी बेटी व्यवहार होतात. घुमान हे नावही जाट लोकांच्या गोत्रावरून पडले आहे.[19] घुमान च्या जागी पूर्वी जंगले होते. नामदेव तेथे वास्तव्यास असतांना दुष्काळी परिस्थितीत काही जाट लोक जंगलात आश्रयास आले. त्यांच गोत्रघुमान असल्याने नामदेव त्यांना घुमान म्हणूनच ओळखत.पुढे या नावाच गावच वसल.

नामदेवांच्या पंथाने जात तोडली व माणस जोडली. त्याचं घुमान येथील मंदिर 3 धर्माचा मिलाप आहे.फिरोजशाह तुघलकाने हे मंदिर बांधल असा अंदाज आहे. मंदिरात मंदीर, मशीद ,गुरुद्वारा या तिन्हींचा संगम आहे. 1980 च्या दशकात पंजाबमध्ये खलीस्थान चळवळ गाजली नामदेवाचा कालखंड 1270 ते 1350 चा होय. ज्ञानेश्वरांनी समाधी घेतल्या नंतर नामदेव पुन्हा हिंदूस्थानात तीर्थाटनासाठी निघाले होते.मध्यप्रदेश, गुजरात,राजस्थान, हरियाणा, उत्तर प्रदेश, दिल्ली येथे नामदेवांची मंदिरे आहे. परप्रांतात जाऊन त्यांनी धर्मजागृती केली. नामदेवांच्या नावावर सव्वाशे हिंदी पदे आहेत.

**नामदेव व नानक :**

गुरुनाकांचा पंथ संत नी वीरांचा पंथ आहे. त्याचमुळे संतविरांचा पूजक असलेल्या महाराष्ट्राचा त्यांच्याशी आणि त्यांच्या परंपरेशी जिव्हाळ्याचा संबंध आहे. नामदेव चौदाव्या शतकाच्या प्रथमार्धात ते पंजाबला गेले.दिडतपापासून राहिल्यावर त्यांनी तेथील वातावरण धर्म जांगृतीने गजबजून सोडले.[21] आक्रमणाच्या असंख्य पदाघातांनी पंजाबचा अणुरेणु तुडवला गेला होता. सारी जनता आक्रमणाने हताश बनली होती. अशा वेळी नामदेवांनी पंजाबला निर्भय सात्यनिष्टेची दीक्षा दिली.

गुरुनानकांनी व त्यांच्या परंपरेतील गुरूंनी नामादेवंविषयी अपार तज्ञता प्रकट केली आहे. 'नामे नारायणे नाही भेद'अशे पाचवे गुरु आणि गुरुग्रंथ लहेबांचे तालकाळ अर्जुनदेव यांनी दिलेली ग्वाही आहे.[22] नानक परंपरेशी महाराष्ट्राचा संस्मरणीय समंध घडला,तो गुरु गोविंद सिंहांच्या जीवनकाळात गुरुनाकांपासून गुरुगोविंदसिहांपर्यंतच्या सर्व शीख गुरूंची आत्मज्योती गुरुग्रंथ साहेबमध्ये झगमगत आहे. महाराष्ट्राच्या ष्टीने हि अभिमानाची बाबा आहे कि, त्याने कधी या झगमगणाऱ्या ज्योतीला आपल्या स्नेहाने प्रज्वलित केली आहे. तर कधी ज्योतीच्या प्रकाशात अस्मितेचे दर्शन अनुभवले आहे.[23] एवढेच नव्हते तर संत नामदेव हे एक वारकर्यांचे आद्य फडकरी होते. त्यांनी आपला संत गोडवा सिकादिनी घाई समांतर फड जगविले अशी माहिती तुकोबांनी दिली आहे.[24]

एकूंदरीत आपण विचार केल्यास महाराष्ट्रात संत नामदेवांनी केलेले कार्य हे ज्ञानदिपा प्रमाणे पंजाबातही प्रसातीत केले. मुळ संकल्पना हि परमेश्वर अस्तित्वाची एकाच असून तिच्यास्वरुपाचे पुरावे पंजाबसारख्या परप्रांतातील भक्तांनी देखील नामदेवांच्या संतविचाराने



Scanned by CamScanner

ISBN 978-93-81549-95-7

आत्मसात केले. आज २१ व्या शतकात देखील पंजाबसारख्या राज्यातील घुमान येथे झालेले "मराठी सम्मेलन" हि नामदेवांच्या कार्याची पावती आहे

**संदर्भग्रंथसूचीः**


1. देशमुख माधव गोपाळ
2. कित्ता पृष्ठ क्र. 12
3. कित्ता पृष्ठ क्र. 15
4. कित्ता पृष्ठ क्र. 15
5. कित्ता पृष्ठ क्र. 16
6. कित्ता पृष्ठ क्र. 17
7. कित्ता पृष्ठ क्र. 17
8. कित्ता पृष्ठ क्र. 17
9. कित्ता पृष्ठ क्र. 17
10. कित्ता पृष्ठ क्र. 18
11. कित्ता पृष्ठ क्र. 19
12. दैनिक महाराष्ट्र टाईम्स – संवाद –29 मार्च 2015 पृष्ठ क्र. 1
13. कित्ता
14. कित्ता
15. दैनिक लोकमत – मंथन – 29 मार्च 2015 पृष्ठ क्र. 5
16. कित्ता
17. कित्ता
18. कित्ता
19. कित्ता
20. दैनिक लोसत्ता – लोकरंग –29 मार्च 2015 पृष्ठ क्र. 1
21. कित्ता
22. कित्ता
23. कित्ता
24. मोरे सदानंद–तुकाराम दर्शन, संकाळ प्रकाशन पुणे, पुनः प्रकाशन जून 2014 पृष्ठ क्र. 118




Scanned by CamScanner